महा मेट्रो

PUNE METRO

## पुणे मेट्रोसाठीच्या कोच पुरवठयासंबंधी किक -ऑफ मिटींग संपन्न



पुणे ३१ ऑक्टोबर २०१९ : पुणे मेट्रोने १६ ऑगस्ट २०१९ रोजी मेट्रो कोचेसची खरेदी संबधीची निविदा मंजूर करण्यात आली होती . टिटागर (Titagrh) हि भारतीय कंपनी असून तिची संयुक्त कंपनी फायरमा ,इटली (Firema,Italy ) यांची निविदा अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाच्या कोच बनवण्यासाठी मंजूर करण्यात आली होती . या निविदेचाच एक महत्वपूर्ण भाग आणि आज दि . ३१.१०.२०१९ रोजी किक -ऑफ मिटींग द्वारे संपन्न झाला आहे. महामेट्रो तर्फे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित , सुनील माथूर डायरेक्टर ऑफ रोलिंग स्टॉक अँड सिग्नलिंग,संचालक (प्रकल्प ) श्री . अतुल गाडगीळ , संचालक (नियोजन ) श्री . रामनाथ सुब्रमण्याम आणि टिटागर चे व्यवथापकीय संचालक श्री.

उमेश चौधरी व फायरमा इटलीचे सीईओ श्री लुइगी कोररडी , श्री . फॅब्रिझिओ झमगनी हेड ऑफ प्रोजेक्ट मानजेमेंट, श्री . फ्रान्सिस्को फलांग हेड ऑफ ऑपेरेशन, श्री. दारिओ सेपे प्रकल्प इंजिनिअर पुणे मेट्रो हे उपस्थित होते. आज संपन्न झालेल्या किक - ऑफ मिटींग मध्ये टिटागर व फायरमाचे मुख्य अधिकारी कोच संरचना गुणवत्ता , उत्पादन संबधी चमू उपस्थित होते. कोच आणि सिग्नल यांचा इंटरफेस, कोच उत्पादन प्रोजेक्ट योजना, कोच सरंचना योजना , कोच गुणवत्ता योजना आणि कोच पुअरवठयासंबंधी वेळापत्रक याविषयी चर्चा करण्यात आली . पहिल्या ८ ट्रेन इटली मध्ये बनविण्यात येणार असून उर्वरीत २६ ट्रेन संच कोलकत्ता व नंतर नागपूर येथील महामेट्रोच्या कारखान्यात बनविण्यात येणार आहे. पुणे मेट्रोसाठी घेण्यात येणाऱ्या ३४ ट्रेन संच (१०२ कोचेस ) ची निविदेची एकूण किंमत ११२४.९६४ कोटी रुपये आहे. भारत सरकारच्या मेक इन इंडिया मिशन अंतर्गत ही एक महत्वपूर्ण सुरवात आहे.

ह्या ३४ ट्रेन्स चा संच (३ कोचचा एक संच ) जागतिक दर्जाच्या उत्कृष्ट तंत्रज्ञानाद्वारे बनविण्यात येणार आहे. मेट्रोचे कोच अल्युमिनियम धातूचा वापर करून बनविल्या मुळे हलके व कमी देखभालीची गरज पडणार आहे. अशा प्रकारचे मेट्रो कोच भारतात पहिल्यादाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर बनविण्यात येणार आहे. या कोच मध्ये अत्याधुनिक वातानुकूलित यंत्रणा व आद्रता नियंत्रक प्रणाली बसविण्यात येणार आहे. कोचची अंतर्गत सजावट ही आकर्षक व सर्वसोयींयुक्त असेल. प्रवाशांना बसण्यासाठी उपयुक्त अशी आसने या कोचमध्ये असतील. ऊर्जा संवर्धनासाठी एलईडी दिव्यांचा वापर या कोच मध्ये करण्यात येणार आहे. प्रवाशांना पुणे शहराचे विहंगम दृश्याचे आनंद घेण्यासाठी कोचमध्ये मोठया काचेचे प्रावदान लावण्यात येणार आहे.

प्रवाशांना ट्रेन संबधी माहिती देण्यासाठी प्रवासी सूचना प्रणाली व आपातकालीन अलार्म प्रणालीची सुविधा या कोचमध्ये असणार आहे. प्रवाशांना सध्याचे ठिकाण , पुढील ठिकाण व त्या पुढील ठिकाण पोहचण्यास लागणारा वेळ यासंबंधित माहिती इलेक्ट्रॉनिक डिस्प्लेद्वारे मिळणार आहे . आपातकालीन परिस्थितीत प्रवाशांना ट्रेनच्या ड्राइव्हरशी थेट संपर्क साधता येणार आहे. प्रवाशांच्यासाठी सुरक्षेसाठी प्रत्येक कोचमध्ये सिसिटीव्ही कॅमेराची सुविधा असणार आहे. या सिसिटीव्हीचे प्रसारण मुख्य नियंत्रक कक्षाला जोडलेले असून नियंत्रण कशाद्वारे प्रवाशांना आपातकालीन परिस्थितीत मदत पोहचवण्यात ताबडतोब हालचाल केली जाईल.

भारतात प्रथमच मेट्रो कोचमध्ये मोफत वायफाय सुविधा पुरवली जाणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कोचेस मध्ये अत्याधुनिक आग नियंत्रक प्रणालीदेखील वापरण्यात येणार आहे.

महामेट्रो एकूण ३४ ट्रेन संच घेण्यात येणार असून प्रत्येक संचात ३ कोच असणार आहे. अशाप्रकारे एकूण १०२ कोच महामेट्रो घेणार आहे. प्रत्येक कोचला ४ एक्सल असून एकूण १६ चाके असणार आहे. दोन चाकांमधील अंतर १४३५ एमएम (गेज) असणार आहे. कोचची लांबी २१.९४ मी. असणार आहे. कोचची रुंदी २.९ मी . व उंची २.०५ मी . असणार आहे. प्रत्येक एक्सल वर येणार लोड १६ टन पर्यंत असणार आहे. कोचचा जास्तीत-जास्त वेग ९५ किमी/तास असणार आहे. एका कोच मध्ये ३०० प्रवासी वाहनक्षमता असून

४३ लोकांना बसण्यासाठी आसन असणार आहे. या ट्रेन संचामध्ये अत्याधुनिक रिजनरेटिव्ह ब्रेकिंग यंत्रणा वापरण्यात येणार आहे. या अनुषंगाने ट्रेनला ब्रेक लावल्यावर जी ऊर्जा निर्माण होते ती परत ट्रेन वरील वीजवाहक तारांमध्ये पोहचवण्यात येइल. यामुळे २५ ते ३० टक्के ऊर्जा बचत होणार आहे.

एका ट्रेन संचामध्ये ३ कोच असणार आहे तसेच भविष्यात प्रवाशांच्या संख्येचा विचार करून या ट्रेनची लांबी ६ कोच पर्यंत करता येऊ शकेल. महामेट्रोच्या प्रत्येक स्टेशनच्या फलाटाची लांबी ६ कोचच्या लांबी एवढी बनविण्यात येत आहे. पुणे मेट्रो मध्ये अत्याधुनिक सिग्नल व ट्रेन कंट्रोल प्रणाली वापरण्यात येणार आहे. त्याद्वारे प्रत्येक ९० सेकंदला एक ट्रेन चालवता येणे शक्य होणार आहे.

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे , महामेट्रो जगातील सर्वोत्तम व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी बांधील असून त्याचाच एक भाग म्हणून उच्च दर्जाचे ट्रेन संच पुणे मेट्रोसाठी बनविण्यात येत आहेत.